**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** लक्ष्मीपूरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0084 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 10/03/2026 22:25

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिंनाक पासून):** 10/03/2026
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिंनाक पर्यंत):** 10/03/2026
**Time From (वेळेपासून):** 15:19 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:46 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 10/03/2026 **Time (वेळ):** 22:11 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 060
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 10/03/2026 22:11 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कोल्हापूर महानगरपालीका इमारतीच, पाठीमागील बाजुस बाजारगेट पोली, कोल्हापूर,समोर असले चहाचे टपरी जवळ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** उज्वला मारूती भडकमकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रति,प्रतिंबधक विभाग, कोल्हापूर,लक्ष्मीपूरी, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रति,प्रतिंबधक विभाग, कोल्हापूर,लक्ष्मीपूरी, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8446153029

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विलास शामराव साळोखे | | | 1. रिसन1154/2/1 प्लट न59,, आनंद इंग्लीश मिडीयम स्कुल, , संत सेना महाराज नगर, फुलेवाडी क,जुना राजवाडा, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500रु दराच्या चार चलनी नोटा असे एकुण 2000/रु मि.कि.स. | 2,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिंयाद दिंनाक - 10/03/2026

मी उज्वला मारूती भडकमकर वय 38 -वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, कोल्हापूर मो. नं. 8446153029 समक्ष गोकुळ शिरगाव पोलीस ठाणेस हजर राहुन फिंयाद देते की,

मी दिंनाक 16/01/2026 रोजी अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात हजर असताना मला वैष्णवी पाटील, पोलीस उपअधीक्षक ला.प्र.वि.कोल्हापूर यांनी 14.00 वा चे सुमारास बोलावुन घेवुन, समक्ष हजर असले तक्रारदार मुस्ता◌ाक अजिज मुल्ला वय - 56 वर्षे, व्यवसाय - कटलरी, रा. 760, बी वार्ड, कुंभार गल्ली, बाजारगेट, कोल्हापूर यांची ओळख करून देवुन, त्यांची लाचे संदर्भात तक्रार असल्याचे सांगितले. त्यांचे तक्रारीवर कारवाई करणेसाठी पंच उपलब्ध करुन घेणेस व आम्हास पुढील कारवाई करणेबाबतचा मुखशील आदेश दिला. त्यावेळी आम्ही सदर तक्रारदार यांना तक्रार विचारली असता, त्यांनी तक्रारीची हकिकत सांगितली की, मी वरील पत्यावर कुटूबिंयासह राहणेस आहे. मी राहणेस असलेल्या ठिकाणीच कटलरीचा व्यवसाय करतो. तसेच मी दरवर्षी रंगपंचमी वेळी कोल्हापूर महानगरपालीकेजवळ बाजारगेट येथे पिवडी व रंगपंचमीचे फुगे यांचा स्टॉल लावुन विक्री करीत असतो चालु वर्षी मी दि.06/03/2026 रोजी ते दि.08/03/2026 रोजी अखेर मी होलसेल दुकानातुन पिवडी रंगपंचमीचे फुगे असे विकत आणुन ते किरकोळ दरामध्ये विक्री करण्याकरीता कोल्हापूर महानगरपालीकेच्या बाजुला असलेल्या बाजारगेट जवळ रस्त्याचे कडेला स्टॉल लावलेला होता. दि.07/03/2026 रोजी मी बाजारगेट कोल्हापूर महानगरपालीके जवळ पिवडीचा व रंगपंचमी फुग्याचा स्टॉल लावुन विक्री करत असताना दुपारी 02.30 वा चे दरम्यान कोल्हापूर महानगरपालीकेच्या अतिक्रमण विभागाचे प्रमुख विलास साळोखे हे माझे स्टॉलवर आले व त्यांनी रस्त्यावर स्टॉल लावुन अतिक्रमण कराय लागलास काय असे म्हणुन मला कारवाईची भिती घातली त्यावेळी मी विंनती केलेवर मला विलास साळोखे यांनी कारवाई न करण्याकरीता 1500/- रूपये द्यावे लागतील असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना काहीतरी कमी करा से म्हणालो. त्यावेळी त्यांनी नाही असे म्हणालेवर मी त्यांना दोन दिवसात काहीतरी जुळणा करून पैसे देतो असे म्हणालो होतो. कोल्हापूर महानगरपालीकेकडील अतिक्रमण विभाग प्रमुख विलास साळोखे हे माझेकडे मागणी करीत असलेले 1500/- रूपये हे लाच म्हणुन मागणी करीत असलेची माझी खात्री झाली आहे. परंतु त्यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेची माझी इच्छा नाही. तरी त्यांचेवर कारवाई करावी, म्हणुन तक्रार सांगुन तक्रारी अर्ज दिला. मी दिंनाक 10/03/2025 रोजीच दुपारी 03.25 वा चे सुमारास सोळोखे साहेब यांची भेट घेणेस कोल्हापूर महानगरपालीका इमारतीचे पाठीमागील बाजुस असले बाजारगेट पोलीस चौकीचे समोर असले चहाचे टपरीजवळ या ठिकाणी जाणार असलेचे सांगितले. त्यानंतर मी लागलीच मा.नगरभूमापन अधिकारी नगरभुमापन कार्यालय, कोल्हापूर, यांचे कार्यालयातुन लेखी रिपोर्टने शासकीय पंच बोलावुन घेतले. शासकीय पंच आलेनंतर आम्ही कार्यालयातील सापळा पथकातील अमंलदार यांना बोलावुन घेतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार मुल्ला यांची पंचाशी व सापळा पथकातील अमंलदार यांचेषी ओळख करुन दिली. माझे सुचनेवरून तक्रारदार मुल्ला यांनी त्यांची तक्रार पंचाना सांगितली. मुल्ला यांनी तोंडी सांगितलेली व लेखी तक्रार एकच असल्याची खात्री झालेनंतर मी, व पंचानी तक्रारी अर्जावर सहया केल्या. त्यावेळी मी पुढील कारवाई अ◌ॅन्टी करप्शन ब्युरोचे ऑफीसमधुन करण्याचे आहे असे सांगुन, तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार मुल्ला व पंच नं.01 शिवतेज संकपाळ यांचेसह सर्वप्रथम कोल्हापूर महानगरपालीके कडील अतिक्रमण विभाग प्रमुख विलास साळोखे हे तक्रारदार यांचेकडे

लाच मागणी करतात, अगर कसे याची पडताळणी करणार आहोत. पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या तसेच शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये झक्ड कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून, रेकॉर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनिमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार मुल्ला व पंचाची खात्री करून दिली. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू बंद करण्याचे प्रात्यक्षीक दाखविले. त्यानंतर पडताळणीचे अनुषंगाने तक्रारदार मुल्ला व दोन्ही पंचाची निवेदने घेतली. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर 15.19 वाजता चालु करून, तो तक्रारदार मुल्ला यांचे गळयात काळ्या दो-याच्या साहयाने अडकवुन, मुल्ला व पंच नं.1 शिवतेज संकपाळ यांना तक्रारदार यांची मोटार सायकल नं. एम.एच. 09 एस.सी. 8104 वरून कोल्हापूर महानगरपालीका इमारतीचे पाठीमागील बाजुस असले बाजारगेट पोलीस चौकीचे समोर असले चहाचे टपरीजवळ या ठिकाणी अतिक्रमण विभाग प्रमुख विलास साळोखे यांची भेट घेणेकरीता पाठविले. त्यावेळी आम्ही,सापळा पथक व पंच नं.02 सुरज बागडे ऑफीसमध्ये थांबुन राहीलो. तक्रारदार मुल्ला व पंच नं.1 शिवतेज संकपाळ असे काहीवेळाने अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात परत आले. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर 15.30 वाजता बंद केला.

त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.01 शिवतेज संकपाळ यांना तुम्ही तक्रारदार यांचेसोबत कोल्हापूर महानगरपालीकेचे अतिक्रमण विभाग प्रमुख विलास साळोखे यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले, याबाबत विचारले असता, पंच संकपाळ यांनी ते तक्रारदार यांचेसोबत कोल्हापूर महानगरपालीका इमारतीचे पाठीमागील बाजुस असले बाजारगेट पोलीस चौकीचे समोर असले चहाचे टपरीजवळ या ठिकाणी गेले त्याठिकाणी तक्रारदार मुल्ला हे अतिक्रमण विभाग प्रमुख विलास साळोखे यांना भेटले. त्यावेळी मुल्ला साळोखे साहेब नमस्कार असे म्हणाले. त्यावेळी साळोखे काय भैय्या असे म्हणाले. त्यावेळी मुल्ला "काय नाही चाललय की तेच जरा निरोप दिल्याला, आता जरा बिल भागवुन आलो हा" असे म्हणाले. त्यावेळी साळोखे हां..हां. असे म्हणाले. त्यावेळी मुल्ला पिवडी वाल्याच आत्ताच जस्ट देवुन आलो. त्यावेळी साळोखे कुणाकडन घेताय पिवडी असे म्हणाले. त्यावेळी मुल्ला ते गायत्री .. असे म्हणाले. त्यावेळी साळाखे आं.. असे म्हणाले. त्यावेळी मुल्ला ते गायत्री बागल चौकात असे म्हणाले. त्यावेळी साळोखे बर असे म्हणाले. त्यावेळी मुल्ला साहेब "जरा काय कमी करा की.." असे म्हणाले. त्याचवेळी साळोखे यांना कोणाचा तरी फोन आल्याने ते फोनवर कोणाशीतरी बोलत होते, फोन बंद केलेनंतर साळोखे साहेब यांनी माझेकडे (पंचाकडे) बघुन "हे कोण मुलगा काय"? असे विचारले. त्यावेळी मुल्ला हे मित्र माल घेवुन गेलाय असे म्हणाले. त्यावेळी साळाखे "किती मं..." असे म्हणाले. त्यावेळी मुल्ला "एक हजार रूपये देतो, हजार रूपये देतो" असे म्हणाले. त्यावेळी साळोखे "फक्त.." असे म्हणाले. त्यावेळी मुल्ला "साहेब लय हुत्यात हो, कष्टाच काम हाय साहेब काय सांगु तुम्हाला" असे म्हणाले. त्यावेळी साळोखे यांनी "त्यांचे हाताची दोन बोटे तक्रारदार यांचे समोर धरून "एवढ करा.." असे म्हणाले. त्यावेळी मुल्ला किती "दोन हजार.." असे म्हणाले त्यावेळी साळाखे " हं.. " असे म्हणाले. त्याचवेळी साळोखे यांना कोणाचा तरी पुन्हा फोन आला. त्यानंतर मुल्ला यांनी साळोखे यांना "साहेब पैसे घेवुन येवु " असे विचारले असता, साळोखे साहेब यांनी "या.". असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार मुल्ला लगेच येतो असे म्हणाले. त्यानंतर मी व तक्रारदार मुल्ला असे परत आलो आहे अशी हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार मुल्ला यांना अतिक्रमण विभाग प्रमुख विलास साळोखे यांना भेटण्यास गेले नंतर काय हकीकत घडली याबाबत विचारले असता त्यांनी पंच नं. 1 संकपाळ यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही डिजिटल व्हाईस रेकॉर्डरमधील तक्रारदार मुल्ला, अतिक्रमण विभाग प्रमुख विलास साळोखे यांचेतील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण दोन्ही पंच व तक्रारदार मुल्ला यांचेसमक्ष ऐकले. यावरून तक्रारदार मुल्ला व कोल्हापूर महानगरपालीकेती अतिक्रमण विभाग प्रमुख विलास साळोखे यांची भेट होवुन त्यांच्यामध्ये तक्रारदार करीत असले पिवडी व्यवसायाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यामध्ये तक्रारदार मुल्ला यांचे तक्रारीमध्ये नुमद असलेप्रमाणे त्यांना अतिक्रमण विभाग प्रमुख विलास साळोखे यांनी पैशासंदर्भात निरोप दिल्याप्रमाणे आल्याचे नमुद करून तक्रारदार यांच्याकडे पडताळणीपुर्वी 1500/- रूपये लाचेची मागणी केली होती त्यामध्ये तक्रारदार मुल्ला यांनी काहीतरी कमी करा असे म्हणुन एक हजार रूपये देतो असे म्हणाले असता, साळोखे यांनी त्यांचे हाताची दोन बोटे तक्रारदार यांचेसमोर धरून एवढे करा असे म्हणाले त्यावेळी तक्रारदार यांनी किती दोन हजार असे विचारले असता त्यांनी हां असे म्हणुन तक्रारदार यांच्याकडे 2000/-रू लाचेची मागणी करून लाच रक्कम लगेच घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यानंतर आम्ही कोल्हापूर महानगरपालीकेचे अतिक्रमण विभाग प्रमुख विलास साळोखे यांचे लाच मागणीचे अनुषंगाने सापळा कारवाई सुरू केली.

सापळा कारवाईचे अनुषंगाने आम्ही सर्वांना सुचना दिल्या. त्यानंतर मी तक्रारदार मुल्ला यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी त्यांचेकडील 500/- दराच्या 04 चलनी नोटा अशी 2,000/- रूपये लाच रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर मी तक्रारदार मुल्ला व पंचाना अॅथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा

व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी दिसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व, संपुर्ण कार्यवाही, तसेच त्याअनुषंगाने तक्रारदार मुल्ला व दोन्ही पंचाची निवेदने घेतली. त्यानंतर अॅंथ्रासिन लावलेले 2,000/- रूपये तक्रारदार यांचे शर्ट डावे बाजुचे खिशात ठेवले. त्यानंतर तक्रारदार मुल्ला, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. तसेच तक्रारदार मुल्ला यांना अतिक्रमण विभाग प्रमुख विलास साळोखे यांनी लाचेची रक्कम स्विकारलेनंतर त्यांनी त्यांचे डोक्यावरील टोपी काढुन हातात घेण्याची आहे असा पुर्वनियोजीत इशारा करणेचा आहे असे सांगितले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर 16.21 वाजता सुरू करून, तो तक्रारदार मुल्ला यांचे शर्टचे आतमध्ये काळे दो-याचे साहयाने गळयात अडकवला. त्यानंतर तक्रारदार मुल्ला व पंच नं.1 शिवतेच संकपाळ असे त्यांचे मोटर सायकलने अॅन्टी करप्शन ब्यरो, कार्यालयातुन साळोखे साहेब यांची भेट घेण्याकरीता महानगरपालीकेच्या पाठीमागे बाजारगेट पोलीस चौकीचे समोर चहाचे टपरी जवळ या ठिकाणी निघाले. त्यावेळी त्यांचे पाठोपाठ मी, सापळा पथक, पंच नं.2 सुरज बागडे असे आपआपले मोटर सायकलने तक्रारदार यांचे पाठोपाठ कोल्हापूर महानगरपालीकेच्या पाठीमागे बाजारगेट पोलीस चौकीचे जवळ आलो. त्यावेळी चहाचे टपरी जवळुन तक्रारदार यांनी कोणाला तरी फोन लावला त्यानंतर त्यांनी आम्हाला हाताने इशारा करून अॅन्टी करप्शन ब्युरो, कार्यालयाकडे येण्यास सांगितले. त्याप्रमाणे आम्ही सर्वजण कार्यालयात परत आलो. यावेळी व्हाईस रेकॉर्डर 16.30 वाजता बंद केला.

त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.01 शिवतेज संकपाळ यांना तुम्ही तक्रारदार यांचेसोबत कोल्हापूर महानगरपालीकेचे अतिक्रमण विभाग प्रमुख विलास साळोखे यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले, याबाबत विचारले असता, पंच संकपाळ यांनी ते तक्रारदार यांचेबरोबर साळोखे साहेब यांना भेटण्यास गेलो होते. त्यावेळी तेथे साळोखे साहेब नव्हते म्हणुन त्यांनी चहाचे टपरीवरती चहावाल्याला विचारले असता त्यांनी साळोखे साहेब गेल्याचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे मो.नं. 9422332321 वरून साळोखे साहेब यांचा मो.नं. 9421111325 वरती फोन केला त्यावेळी मुल्ला अहो तेच की आता संकेत च्या इथ चहा च्या गाडीवर आला नव्हता काय आपण असे म्हणाले. त्यावेळी साळोखे संकेत.. संकेत जवळ हे करा असे म्हणाले. त्यावेळी मुल्ला साहेब आणि एक काम जरा हाय जरा भेटायच हाय म्हणुन म्हणलो असे म्हणाले. त्यावेळी साळोखे नंतर भेटुया की, संध्याकाळी असे म्हणाले. त्यावेळी मुल्ला किती वाजता असे विचारले असता साळोखे यांनी सहा नंतर असे म्हणाले त्यानंतर आम्ही परत आल्याचे सांगितले. तक्रारदार मुल्ला यांना ही सापळा कारवाईवेळी साळोखे यांना भेटणेस गेलेनंतर काय घेडले असे विचारले असता त्यांनी पंच संकपाळ यांचेशी मिळतीजुळती हकीकत सांगितली. साळोखे यांनी तक्रारदार मुल्ला यांना सहा नंतर भेटुया असे सांगितल्याने पुढील सापळा कारवाई साळोखे यांचा फोन आलेनंतर करण्याचे सर्वामते ठरले. काहीवेळाने साळोखे साहेब चहाचे टपरी जवळ आले आहेत अगर कसे हे पाहण्यासाठी साळोखे यांना त्यांचे वरील मो.नं. वरती तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल नंबर वरून फोन केला त्यावेळी साळोखे साहेब यांनी तक्रारदार यांना महानगरपालीकेच्या पाठीमागे चहाचे टपरीजवळ येण्यास सांगितले.

त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर 18.40 वाजता सुरू करून, तो तक्रारदार मुल्ला यांचे शर्टचे आतमध्ये काळे दो-याचे साहयाने गळयात अडकवला. त्यानंतर तक्रारदार मुल्ला व पंच नं.1 शिवतेच संकपाळ असे त्यांचे मोटर सायकलने अॅन्टी करप्शन ब्यरो, कार्यालयातुन साळोखे साहेब यांची भेट घेण्याकरीता निघाले. त्यावेळी त्यांचे पाठोपाठ मी, सापळा पथक, पंच नं.2 सुरज बागडे असे आपआपले मोटर सायकलने तक्रारदार यांचे पाठोपाठ कोल्हापूर महानगरपालीकेच्या पाठीमागे बाजारगेट पोलीस चौकीचे जवळ आलो. तेथे आम्ही आजुबाजुला सापळा लावुन थांबलो. तक्रारदार मुल्ला यांनी कोल्हापूर महानगरपालीकेचे अतिक्रमण विभाग प्रमुख विलास साळोखे यांनी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला असता मी, पंच नं.02 सुरज बागडी व स्टाफ तेथे गेलो. तक्रारदार मुल्ला यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर 18.46 वाजता बंद करून, तात्काळ लाच स्विकारलेल्या रक्कमेसह विलास साळोखे यांना पकडले. त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.1 संकपाळ यांना सापळा कारवाईवेळी काय हकीकत घडली असे विचारले असता, त्यांनी सांगितले की, त्यावेळी तक्रारदार मुल्ला व साळोखे साहेब यांचेत तक्रारदार यांचे एका दुस-या कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी मुल्ला यांनी साळोखे यांना "साहेब हे घ्या.." असे म्हणुन त्यांनी तक्रारदार यांच्याकडे मागणी केलेली 2000/- रूपये लाच रक्कम त्यांचे समोर धरली त्यावेळी साळोखे यांनी तक्रारदार यांच्याकडुन डाव्या हाताने लाच रक्कम स्विकारून त्यांचे मोटर सायकल क्रमांक एम.एच.09.डी.व्ही.9270 वरती असले पिशवी मध्ये ठेवली व "आर उघडच दयायला लागलाईस व्हय.." असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार मुल्ला नाही, असुदे घराकड जाणार असे म्हणाले. त्यावेळी साळोखे व्हय.. असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार मुल्ला यांनी विलास साळोखे यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतरचा नियोजीत इशारा केला असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना विचारले असता त्यांनी पंच संकपाळ यांचे हकीकतशी मिळती जुळती हकीकत सांगितली. सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या करून पंचाचे समक्ष विलास साळोखे यांचेकडुन लाच रक्कम

हस्तगत केली. सदर सापळा ठिकाणचे व्हिडीओ शुटींग आमचे सुचनेवरून सापळा पथकातील अमंलदार यांनी केलेले आहे. त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालय येथे पुर्ण करण्यात आ ली आहे.

तरी यातील मुळ तक्रारदार मुस्ताक अजिज मुल्ला हे कोल्हापूर शहरात बाजारगेट परिसरात कटलरी व्यवसाय करतात कोल्हापूर महानगरपालीकेच्या अतिक्रमण विभागाचे प्रमुख विलास साळोखे हे रंगपंचमी चे सणादरम्यान तक्रारदार यांचे स्टॉलवरती येवुन स्टॉल लावुन अतिक्रमण कराय लागलास काय असे म्हणुन तक्रारदार मुल्ला यांना कारवाईची भिती दाखवुन कारवाई न करण्याकरीता तक्रारदार यांच्याकडे 1500/- रूपये द्यावे लागतील असे म्हणुन लाच मागणी केली होती. त्यानंतर आज रोजी पडताळणी कारवाईमध्ये तक्रारदार यांचेवर अतिक्रमण ची कारवाई न करणेसाठी 2,000/- रूपये लाचेची बेकायदेशिरपणे मागणी करून मागणी केलेली 2,000/- रूपये लाच रक्क्म तक्रारदार मुल्ला यांचेकडुन, बेकायदेशीरपणे व अप्रामाणिकपणे स्विकारताना त्यांना आम्ही व सापळा पथकाने पकडले आहे. म्हणुन माझी विलास शामराव साळोखे, वय- 55 वर्षे, अक्षीक्षक, इस्टेट ऑफीसर, इस्टेट विभाग, अतिरिक्त कार्यभार अतिक्रमण विभाग, कोल्हापूर महानगरपालीका कोल्हापूर वर्ग - 3 रा. , रा. रि.स.नं.1154/2/1 प्लॉट नं.59, आनंद इंग्लीश मिडीयम स्कुल, संत सेना महाराज नगर,फुलेवाडी कोल्हापूर यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिंबधक कायदा 1988 चे कलम 7 प्रमाणे माझी फिंयाद आहे.

माझा वरील वर्दीजबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखित केलेला असून, तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

समक्ष हा दिला जबाब स. ता. म.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

shriram kalyanrao kanherkar(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): shriram kalyanrao k

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**